**क्र.का.११/प्र.क्र.१९८५/९६/२१३-५९६**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे १.**
**दिनांक : ५/९/१९९६**

# प रि प त्र क :-

**विषय** :- **नोंदणी महानिरीक्षक/सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक/ नोंदणी उपमहानिरीक्षक (विभागीय)/ सह जिल्हा निबंधक/जिल्हा निबंधक यांनी विविध कार्यालयांवर काढलेल्या निरीक्षण टिपण्यांचे अनुपालनाबाबत..**

राज्यातील दुय्यम निबंधक, सहकारी जिल्हा निबंधक, नोंदणी उपमहानिरीक्षक सक्षम अधिकारी यांचे कार्यालयाच्या तपासण्या मा. नोंदणी महानिरीक्षक/सहा. नोंदणी महानिरिक्षक/नोंदणी उपमहानिरीक्षक/सह जिल्हा निबंधक/जिल्हा निबंधक यांचेकडून केल्या जातात. या सर्व अधिकाऱ्यांनी काढलेल्या निरीक्षण टिपण्या या कार्यालयात अंतिम आदेशासाठी पाठविल्या जातात व या कार्यालयाकडून अंतिम आदेशही पारित होतात.

या कार्यालयाकडून ज्या निरीक्षण टिपण्यांवर अंतिम आदेश संबंधितांना निर्गमित केले आहेत, अशा प्रकरणाची छाननी केली असता या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, अंतिम आदेश पाठवूनही बऱ्याच संबंधितांना या कार्यालयास अद्यापपावेतो प्रथम अनुपालन अहवाल पाठविलेले नाहीत ही खेदजनक बाब आहे.

अनुपालन न केल्यामुळे प्रस्तुतची प्रकरणे निकाली होणेवर प्रलंबित आहेत. यास्तव या कामाचा जलद गतीने निपटारा होण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

१) सर्व संबंधितांनी आपले कार्यालयात कोणकोणत्या निरीक्षण टिपण्यांवर अंतिम आदेश प्राप्त आहेत याची खातरजमा करावी.

२) निरीक्षण टिपणीतील वसूलीच्या परिच्छेदावर भर देऊन त्यातील वसूलीचा पाठपुरावा करावा.

३) सह जिल्हा निबंधक / नोंदणी उपमहानिरिक्षक यांनी मासिक सभेत प्रस्तुत विषयांवर चर्चा करावी व संबंधितांना प्रलंबित अनुपालनाचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत आदेशित करावे व त्या कार्यवाहीचा पाठपुरावा करावा.

४) ज्या अधिकाऱ्यांनी निरिक्षण टिपणीचा प्रथम अनुपालन पाठविला असेल त्यांनी त्याची झेरॉक्स प्रत व त्यासाबत अंतिम अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५) अनुपालनाच्या प्रक्रियेत काही माजी दुय्यम निबंधक यांची अपूर्ण काम, मूळ दस्तऐवजावरील स्वाक्षऱ्या, शेरे लिहिणे, खुलासे इत्यादी स्मरणपत्रे पाठवून ही कामाची पूर्तता करीत नाहीत. म्हणून हे परिपत्रक प्राप्त होताच त्यांचा पुन्हा कामे पूर्ण करण्याची व खुलासे सादर करण्यात यथास्थिती मुदत द्यावी. मुदतीत संबंधितांनी कामे पूर्ण न केल्यास त्यांची नांवे त्वरीत या कार्यालयात कळवावीत. कामाचे दिरंगाईबाबत संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल.

६) ज्या दुय्यम निबंधकांना अनुपालन प्रणालीबाबत माहिती नसेल त्यांनी संबंधित सह जिल्हा निबंधक यांचेकडून मासिक सभेच्या वेळी मार्गदर्शन घ्यावे.

७) अनुपालन अहवाल पाठविताना बरेच दुय्यम निबंधक/संबंधित अधिकारी अग्रेषण पत्रात संदर्भात या कार्यालयाचा प्रकरण क्रमांक नमूद करीत नाहीत. त्यामुळे या स्तरावर प्रकरणांचा शोध घेण्यास विलंब लागतो. यास्तव यापुढे अनुपालन अहवाल पाठविताना त्यांत प्रकरण क्रमांक आवश्य नमूद करावा.

येणेप्रमाणे उपरोक्त सूचनांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करावे व त्यांचे त्यांचे कार्यालयाचे अनुपालन अहवाल त्वरीत या कार्यालयास हे परिपत्रक त्यांना प्राप्त झालेपासून दोन महिन्याचे आत या कार्यालयात सादर करावेत.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही /-**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करीता.**

**प्रति,**

**१) सर्व दुय्यम निबंधक**
**२) सर्व सह जिल्हा निबंधक ( दु. नि. यांचे जादा प्रतीसह)**
**३) सर्व सक्षम अधिकारी**

**प्रत : सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.**